नवनिर्मित पालघर जिल्हयातील जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र व जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय या तीन कार्यालयाकरीता नवीन पदे निर्माण करणेबाबत..

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांक:-पसंप्र-२०१४/प्र.क्र.३८७/पदुम -१

५ वा मजला विस्तार, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक:- ०४ जानेवारी, २०१८.

<u>वाचा</u>:-१) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. प्राफेब-११०८/प्र.क्र.१६७ /ठाणे:/म १०, दि.३१.७.२०१४.

२) आयुक्त पशुसंवर्धन यांचे पत्र क्र.व्हीएचडी/११२/१०४/२०१६-१७/पसं-१२,औंध पुणे-०७ दि.१६.०१.२०१७.

३) अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन यांचे पत्र क्र.बीजीटी -१/नवनिर्मित पालघर/६९/३१८/२०१७ पंस-५ औंध पुणे–६७ दि.०४.१२.२०१७.

<u>प्रस्तावना:-</u>

शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. प्राफेब-११०८/प्र.क्र.१६७ /ठाणे/म-१०, दि.३१.७.२०१४ अन्वये ठाणे जिल्हयाचे विभाजन करुन पालघर जिल्हयाची निर्मिती करण्यात आली आहे. नवीन पालघर जिल्हयाकरिता जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय,जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र व जिल्हा पशुवैदयकीय सर्वचिकित्सालय ही तीन कार्यालय निर्माण करणे आवश्यक असल्याने सदर कार्यालयासाठी लागणारा अधिकारी/कर्मचारीवृंद, उच्चाधिकार समितीची मान्यता घेऊन त्या त्या विभागाने निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. नवीन पालघर जिल्हयात वसई, पालघर, डहाणू, तलासरी, जव्हार, वाडा, मोखाडा, विक्रमगड या आठ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार उपरोक्त नवनिर्मित तीन कार्यालयांसाठी कर्मचारीवृंद पुरविणे आवश्यक असल्याने सदर तीन कार्यालयांकरीता नवीन पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

वरील वस्तुस्थितीच्या अनुषंगाने नवनिर्मित पालघर जिल्हयात जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय,जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र व जिल्हा पशुवैदयकीय सर्वचिकित्सालय या तीन कार्यालयांकरीता ११ नियमित पदे, १० काल्पनिक पदे (बाहयस्त्रोताद्वारे) निर्माण करावयास व ४ पदे समायोजनाव्दारे भरण्यास या प्रमाणे एकूण २५ अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करण्यास मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव उच्च स्तरीय सचिव समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. उच्चस्तरीय सचिव समितीची बैठक क्रमांक ४/२०१७ दि.२६.१०.२०१७ मध्ये समितीने विभागाच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. त्यास अनुलक्षुन नवनिर्मित पालघर या जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, जि.पालघर, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, जि.पालघर, व जिल्हा पशुवैदयकीय सर्वचिकित्साल, जि.पालघर या तीन कार्यालयांची स्थापना करण्यासाठी खालील विवरण पत्र क्रमांक १, २ व ३ मध्ये दर्शविल्यानुसार ११ नियमित पदे, १० काल्पनिक पदे (बाहयस्त्रोताद्वारे) निर्माण करावयास व ४ पदे समायोजनाव्दारे भरण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) **जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय,पालघर:-**

अ.क्र.	पदनाम व गट		वेतन श्रेणी	मंजूर केलेली पदे
१	जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त	गट- अ	१५,६००-३९१०० ग्रेड पे ६६००	१
	सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन	गट- अ	१५,६०० - ३९००० ग्रेड पे ५,७००	१
	पशुधन पर्यवेक्षक	गट-क	५२००-२०२०० ग्रेड पे २४००	१
	वरिष्ठ सहाय्यक	गट-क	९३००-३४८०० ग्रेड पे ४२००	१
	कनिष्ठ लिपिक - टंकलेखक #	गट-क	५२००-२०२०० ग्रेड पे १९००	१
	शिपाई/परीचर*		४४४०-७४४० ग्रेड पे १३००	२
			एकूण	**७**

समायोजनाव्दारे ** काल्पनिक पदे बाहयस्त्रोताद्वारे*

वरील विवरणपत्रातील जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त १ पद व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन १ पद,पशुधन पर्यवेक्षक १ पद तसेच वरिष्ठ सहाय्यक १ पद अशी एकूण ४ पदे नव्याने निर्माण करण्यास, कनिष्ठ लिपिक- टंकलेखकाचे १# पद जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त जि.ठाणे (मुख्यालय- मुलुंड) या कार्यालयातून जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, जिल्हा पालघर या कार्यालयाकडे वर्ग करुन समायोजनाव्दारे भरण्यास तसेच शिपाई/परीचर गट-ड संवर्गातील २* काल्पनिक पदे बाहयस्त्रोताद्वारे (outsourcing) भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरील निर्माण करण्यात येणाऱ्या पदांच्या वेतन भत्यावरील व वेतनेत्तर खर्च राज्यस्तरीय योजनेतून खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा:-

<u>**लेखाशिर्ष**</u>

मागणी क्र. डी-४

२४०३-पशुसंवर्धन, (००)१०१ संचालन व प्रशासन (०१) योजनेत्तर योजना

(०१)(०३) जिल्हा व कार्यालय (सांकेतांक २४०३ ००४२) (अनिवार्य)

सद्य:स्थितीत पशुधन तपासणी नाका ता. तलासरी, जि.पालघर येथील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते तसेच वेतनेत्तर खर्च मागणी क्र.डी-५, २४०३ पशुसंवर्धन, (००) १०१ पशुवैद्यकीय सेवा पशुआरोग्य,(०१) योजनेत्तर योजना (०७) (०१) आंतरराज्य सीमेवरील चौक्या व दक्षता पथके (संकेतांक २४०३ ०२०२) या लेखाशिर्षाखाली निधी आहरीत व वितरित करण्याचे अधिकार जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त जि.ठाणे (मुख्यालय -मुंलूंड) यांना असून यापुढे हे अधिकार जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, जिल्हा पालघर यांना प्रदान करण्यात येत आहेत. या करीता सेवार्थ प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

२) **जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय,पालघर:-**

पदनाम	गट	वेतनश्रेणी	मंजूर पदे
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन	गट-अ	१५६००-३९१०० ग्रेड पे ५७००	१
पशुधन विकास अधिकारी #	अ/ब	१५६००-३९१०० ग्रेड पे ५४००	२+१# = ३
सहाय्यक पशुधन विकास अधिकारी#	गट- क	५२००-२०२०० ग्रेड पे २८००	१
पशुधन पर्यवेक्षक	गट- क	५२००-२०२००ग्रेड पे २४००	१
कनिष्ठ लिपिक -टंकलेखक	गट- क	५२००-२०२०० ग्रेड पे १९००	१
वाहन चालक	गट- क	५२००-२०२००ग्रेड पे १९००	१
सफाई कामगार*	गट -ड	४४४०-७४४०ग्रेड पे १३००	१
रात्र पहारेकरी*	गट -ड	४४४०-७४४०ग्रेड पे १३००	१
वर्णोपचारक*	गट -ड	५२००-२०२०० ग्रेड पे १८००	२
शिपाई/परिचर*	गट -ड	४४४०-७४४० ग्रेड पे १३००	२
		एकूण	**१४**

समायोजनाव्दारे ** काल्पनिक पदे बाहयस्त्रोताद्वारे*

वरील विवरणपत्रातील सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन १ पद, पशुधन विकास अधिकारी २ , पशुधन पर्यवेक्षक १ पद, कनिष्ठ लिपिक - टंकलेखक १ पद, वाहनचालक १ पद अशी एकण ६ पदे नव्याने निर्माण करण्यास, तसेच जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, भिवंडी, जि.ठाणे या कार्यालयातील कार्यरत पशुधन विकास अधिकारी १ पद व सहाय्यक पशुधन विकास अधिकारी १ पद अशी २# पदे जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय,पालघर या कार्यालयाकडे वर्ग करुन समायोजनाव्दारे भरण्यास त्याच प्रमाणे सफाई कामगार १ पद, रात्र पहोरकरी १ पद व्रणोपचारक २ पदे व शिपाई/परीचर २ पदे या प्रमाणे ६* काल्पनिक पदे बाहयस्त्रोताद्वारे (outsourcing) भरण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

वरील निर्माण करण्यात येणाऱ्या वेतन भत्यावरील खर्च राज्यस्तरीय योजनेतून खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

<u>लेखाशिर्ष</u>

मागणी क्र. डी-४

२४०३-पशुसंवर्धन, (००)(१०१) पशुवैद्यकीय सेवा व पशुआरोग्य,

(०८) पंचवार्षिक योजना, राज्य योजनेत्तर योजना

(०८)(०२) पशुवैद्यकीय बहूचिकित्सालयाचा विस्तार व अधुनिकी करणे

(जिल्हा) राज्य योजनांतर्गत योजना, (सांकेतांक २४०३ ०२११) (अनिवार्य)

३) जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,पालघरः-

पदनाम	गट	वेतनश्रेणी	मंजूर पदे
पशुधन विकास अधिकारी		१५६००-३९१०० ग्रेड पे ५४००	१
सहाय्यक पशुधन विकास अधिकारी#	गट-क	५२००-२०२०० ग्रेड पे २८००	१
प्रयोगशाळा परिचर/स्वच्छक*	गट-ड	४४४०-७४४० ग्रेड पे १३००	२
		एकूण	**४**

समायोजनाव्दारे **** काल्पनिक पदे बाहयस्त्रोताद्वारे***

वरील विवरणपत्रातील पशुधन विकास अधिकारी १ पद नव्याने निर्माण करण्यास, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, भिवंडी, जि.ठाणे या कार्यालयातील सहाय्यक पशुधन विकास अधिकारी हे १ # पद जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,पालघर या कार्यालयाकडे वर्ग करुन समायोजनाव्दारे भरण्यास तसेच प्रयोगशाळा परिचर/स्वच्छक ही २ * काल्पनिक पदे बाहयस्त्रोताद्वारे (outsourcing) भरण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे निर्माण करण्यात येणाऱ्या पदावरील वेतन भत्याचा खर्च राज्यस्तरीय योजनेतून खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

<u>लेखाशिर्ष</u>

मागणी क्र. डी-४

२४०३-पशुसंवर्धन, (००) १०२,पशु व महिष विकास, राज्य योजनेत्तर योजना

(०८) कृत्रिम रेतन केंद्र, (०८) (०१) कृत्रिम रेतन केंद्र- राज्य योजनांतर्गत योजना

(सांकेतांक २४०३ ०४३६) (अनिवार्य)

३. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, जि.पालघर, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, जि.पालघर, व जिल्हा पशुवैदयकीय सर्वचिकित्सालय, जि.पालघर, या तीन कार्यालयांसाठी वेतन व भत्यासाठी आवश्यक असलेला निधी सन २०१७-१८ मध्ये राज्यस्तरीय योजनेमधून उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा. यासाठी पूरेसा निधी उपलब्ध नसल्यास तो पुनर्विनियोजनाव्दारे उपलब्ध करुन घेण्यात यावा. वेतनेत्तर

बाबींसाठी चालू आर्थिक वर्षात पुरेसा निधी उपलब्ध नसल्यास तो संबंधित जिल्हयाच्या जिल्हा नियोजन समितीकडून पुनर्विनियोजनाव्दारे उपलब्ध करुन घेण्यात यावा.

४. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, जि.पालघर, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, जि.पालघर, व जिल्हा पशुवैदयकीय सर्वचिकित्सालय, जि.पालघर, या तीन कार्यालयांची स्थापना झाल्यापासून पुढील पाच वर्षाच्या कालावधीसाठी वेतन व भत्ते यासाठी उपरोक्त नमुद केलेल्या लेखाशिर्षाखाली राज्यस्तरीय योजने अतंर्गत निधी प्रस्तावित करण्यात यावा व वेतनेत्तर बाबींसाठी बिगर आदिवासी सर्वसाधारण योजने अंतर्गत निधीची मागणी संबंधित जिल्हयाच्या जिल्हा नियोजन समितीकडे करावी.

५. नवनिर्मित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त हे पद पदोन्नकतीने भरण्याबाबत तसेच सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या पदांबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवावयाच्या मागणीपत्राचा प्रस्ताव आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तात्काळ सादर करावा. तसेच नवनिर्मित सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, कनिष्ठ लिपिक टंकलेखक, वाहन चालक, व बाहयस्त्रोताव्दारे व्रणोपचारक, प्रयोगशाळा परिचर/स्वच्छक, परिचर, रात्र पहारेकरी व सफाई कामगारांची पदे भरण्यासंदर्भात आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तात्काळ कार्यवाही करावी.

६. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.२५२/आपूक दि.२९.०५.२०१७ अन्वये व त्यांच्या सहमतीने तसेच वित्त विभाग पृष्ठांकन क्र.पदनि-२०१७/प्र.क्र.६५/१७/आ.पु.क दि.०७.११.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या मा.उच्च स्तरीय सचिव समितीच्या दि.२६.१०.२०१७ रोजी पार पडलेल्या क्र.०४/१७ च्या बैठकीच्या कार्यवृतानुसार उक्त नवीन पदनिर्मितीस देण्यात आलेल्या मान्यतेस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक क्र. २०१८०१०४१६३२५९३४०१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vinod Sopanrao Mendhe

Digitally signed by Vinod Sopanrao Mendhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3dfd984bb7c5aede090473e34b1c93fa9f36d97d56c0cf07812a43c5ca5d6a24, cn=Vinod Sopanrao Mendhe
Date: 2018.01.04 16:38:25 +05'30'

(वि.सो.मेंढे)

कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त पशुसंवर्धन,महाराष्ट्र राज्य, पुणे -६७.
२) जिल्हाधिकारी पालघर/ठाणे.
३) प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, मुंबई विभाग, महानंदा डेअरीजवळ, गोरेगांव (पुर्व), मुंबई-६५.
४) सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय), पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७.
५) जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त ठाणे/पालघर.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे/पालघर.
७) महालेखापाल-१ महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), मुंबई.
८) संचालक, लेखा व कोषागारे, बांद्रा (पुर्व) , मुंबई.
९) अधिदान व लेखा अधिकारी, बांद्रा (पुर्व) , मुंबई.
१०) वित्त विभाग (अर्थसंकल्प-३/व्यय-२/ वित्तीय सुधारणा-१/आ.पु.क.) मंत्रालय, मुंबई.
११) निवड नस्ती (कार्यासन पदुम-१)